1

ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12 ]
Total No. of Printed Pages : 12 ]
ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45 ]
Total No. of Questions : 45 ]

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**
**Code No. : 08-M**

**A**

**CCE RR**
**UNREVISED**
**FULL SYLLABUS**

Question Paper Serial No. **210**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
# Subject : First Language — MARATHI

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater )**

ದಿನಾಂಕ : 12. 06. 2023 ] [ Date : 12. 06. 2023
ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.



येथून कापा.

TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER
प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.

Tear here

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6**

1. 'तेजःकण' हे खालीलपैकी कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?

   (अ) स्वर संधी (ब) व्यंजन संधी

   (क) विसर्ग संधी (ड) यापैकी नाही

2. "आदिती अभ्यास करत आहे" या वाक्यात हा काळ आहे –

   (अ) वर्तमानकाळ (ब) भूतकाळ

   (क) भविष्यकाळ (ड) पूर्ण भूतकाळ

3. "नावडतीचे ............. अळणी" ही म्हण पूर्ण होण्यासाठी योग्य शब्द हा आहे –

   (अ) पीठ (ब) भाजी

   (क) पोळी (ड) मीठ

4. "आराध्या गाणे गाते." या वाक्यात हा प्रयोग आहे –

   (अ) कर्मणी (ब) कर्तरी

   (क) भावे (ड) यापैकी नाही

5. 'दररोज प्रसिद्ध होणारे' या शब्दसमूहासाठी एक योग्य शब्द हा आहे –

(अ) दैनिक (ब) वार्षिक

(क) मासिक (ड) साप्ताहिक

6. 'पृथ्वी' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –

(अ) जल (ब) भास्कर

(क) वसुंधरा (ड) जीवन

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध आळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **4 × 1 = 4**

7. चा, ची, चे : षष्ठी विभक्ती : : त, ई, आ : ................

8. पद्मनाभ : बहुव्रीही समास : : पेरापेरात : .............

9. हिमालय : विशेष नाम : : खेळतो : ..................

10. सत्य : असत्य : : अल्पायुषी : .......................

**III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 7 × 1 = 7**

11. गणातात्यांनी किती वाटण्या करण्यास सांगितल्या ?

12. गंगूबाईंनी कोणत्या चित्रपटात भूमिका केली ?

13. संत ज्ञानेश्वरांनी कोणत्या ठिकाणी संजीवन समाधी घेतली ?

14. दोघा जावांच बोलण गणातात्यांना कसे झोंबत होते ?

15. पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो ?

16. कवी कावळ्याचे पाय कशाने मढविणार आहेत ?

17. गुराख्याचे पाय कशामुळे निब्बर होतात ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : 3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) पांग फेडणे ब) कैलासवासी होणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

'दंड कमंडलू बंड माजविशी मुंडमुंडशी तपा.'

20. गण पाडून वृत्त ओळखा.

'घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा.'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : 7 × 2 = 14**

21. केसोबास यांचा थोडक्यात परिचय लिहा.

22. ''आत्मविश्वास ही दैवी शक्ती आहे.'' असे डॉ० बाबासाहेब आंबेडकर का म्हणतात ?

23. सावित्रीबाइ चार वर्षाच्या झाल्या तेव्हा त्यांची आई त्यांना काय म्हणाली ?

24. ''फार सुंदर सेवा केलीत शारदांबेची.'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

25. शाहीर रामजोशी यांचा परिचय लिहा.

26. 'सुन्या तिच्याही दाही दिशा' या कवितेतील स्त्रिया कोणकोणते कष्ट सहन करतात ?

27. ''विठ्ठला विठ्ठला । आम्ही अन्नभक्त''

संदर्भासह स्पष्टीकरण करा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

28. अ) आरोग्यम् धनसंपदा

**किंवा**

ब) मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।।

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा : 10 × 3 = 30**

29. वसईच्या किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले ?

30. लेखकाला व त्यांच्या कुटुंबियांना जेवण सोडून अर्धपोटी का उठावे लागले ?

31. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

32. पिंपळ, बांबू, चाफा या वृक्षांची कोणती वैशिष्ट्ये लेखक गुलजार यांनी सांगितली आहेत ?

33. लेखक उत्तम कांबळे कोणते दिवास्वप्न पहात असत ?

34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

35. पाहुणे कोठून आले आहेत असे आई मुलाला सांगते ?

36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून तारे, शुक्र, सुधांशू कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

37. पहिल्या हिरव्या तृणपात्याचा सत्कार कशाप्रकारे करण्यात आला ?

38. 'धरण' कवितेचा थोडक्यात आशय लिहा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. "आपण शेकडा नव्वद टक्के गोष्टी केवळ दुसऱ्यांकरिता करीत असतो" असे लेखक का म्हणतात ?

**किंवा**

पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकरांनी कसा पटवून दिला आहे ?

40. डॉक्टर रवींद्र कोल्हे यांनी शिबिरामध्ये शेती, आरोग्य, पर्यावरण व शासकीय योजना याविषयाची मुलांना कोणती माहिती दिली ?

**किंवा**

डॉक्टरांनी सुरू केलेल्या शिबिराचा कोणता अदृश्य परिणाम झाला ?

41. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

कोंदला अंधार ....................................

......................................................

......................................................

............................................ जीविती.

**किंवा**

देश ज्यांचा ........................................

......................................................

......................................................

........................................... ततक्षिती.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा : $1 \times 4 = 4$**

43. मातेच्या प्रेमाशी कशाचीच तुलना होऊ शकत नाही. प्रत्येक माता आपल्या बाळाच्या संगोपनासाठी त्याच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न करीत असते. ती आपल्याला ममतेने आपुलकीने वाढवते. दया, प्रेम, मानवधर्म, भूतदया यांचे धडे देते. वळप्रसंगी कठोर वागते पण मुलांवर सुसंस्काराचे बोजारोपण करते. आई ही जणू कुटुंबांतील दीपस्तभ असते. आपल्या घरासाठी दुःखाचा डोंगर पेलणारी ती माताच असते. म्हणून तिच्या रूपात परमेश्वर दिसतो. श्रावण बाळाने आपल्या आई-वडिलांना कावडीत बसवून देवदर्शन घडवून आणले. तर भक्त- पुंडलिकाने

प्रत्यक्ष पांडुरंग दारात आल्यानंतर देखील आई-वडिलांच्या सेवेत खंड पडू दिला नाही. अशा अनेक उदाहरणातून मातृभक्ती दिसून येते. आईच्या संस्कारांची शिदोरी आपल्याबरोबर कायम असते. आईच्या ऋणातून कोणीही मुक्त होऊ शकत नाही.

**प्रश्न :**

अ) प्रत्येक माता आपल्या मुलावर कशाप्रकारे संस्कार करते ? 2

ब) वरील उताऱ्यात कोणत्या उदाहरणातून मातृभक्ती दिसून येते ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

44. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तुम्हो पुढे काय करणार आहात ते तुमच्या मित्राला / मैत्रिणीला पत्राद्वारे कळवा.

**किंवा**

शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. अ) वाचन : एक उत्तम छंद

ब) वाढती लोकसंख्या – एक समस्या.